# खऱ्या यशाचे रहस्य

यशस्वी होण्यासाठी सर्वप्रथम एक ध्येय निश्चित करावे लागते आणि त्यानंतर योग्य दिशेने मार्गक्रमण करत राहायचे असते. कसलाच आळस न करता हा प्रवास तोपर्यंत सुरूच ठेवायचा असतो जोपर्यंत पूर्णपणे यश मिळत नाही.

वरील नियमानुसार कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होता येते.

पण यश म्हणजे काय? काय मिळवणं म्हणजे यशस्वी होणं?

प्रत्येकाकडे यशाची वेगवेगळी व्याख्या असते. पण सर्वांचा यशामागील उद्देश मात्र एकच असतो आणि तो म्हणजे सुख, समाधान, मनःशांती प्राप्त करण्याचा. अशा वेळेस त्या व्यक्तीला खऱ्या अर्थाने यशस्वी म्हणता येईल जी यशप्राप्तीनंतर पूर्णपणे शांती व समाधानात राहत असेल.

पण दुर्दैवाने जगातील कोणताही माणूस पूर्णपणे सुखासमाधानात असल्याचा दावा करू शकत नाही. प्रत्येकाला कशा ना कशाची नेहमीच उणीव भासत असते. कधी त्याला एखाद्या त्रासापासून मुक्ती हवी असते तर कधी एखाद्या दुसऱ्या गोष्टीची त्याला गरज पडते. त्याला वाटतं परिस्थिती अशी असती तर जास्त बरं झालं असतं पण परिस्थिती तशी झाल्यावर परत त्याला अपुरेपणा जाणवतो. जीवनभर हे असंच चालू असतं. हे यासाठी असं घडतं कारण माणूस आपल्या हिशेबानेच जीवनाचा उद्देश ठरवण्याचा प्रयत्न करत असतो, जीवन देणाऱ्याचा जीवन देण्यामागे काय उद्देश होता हे शोधण्याचा तो प्रयत्न करत नाही.

माणूस स्वतःहून या जगात आलेला नाही. जन्म घेणाऱ्याला जन्म घेण्याआधी या जगात येण्याची कल्पना नव्हती. किंवा मरणाऱ्याला मरण्याआधी या जगातून जाण्याची कल्पना नसते. ही वास्तविकता हे दर्शवते की त्याच्यावर दुसऱ्या कोणाचं तरी नियंत्रण आहे. या नियंत्रणकर्त्याला आपण ईश्वर म्हणू शकतो. अर्थात माणूस ईश्वराची निर्मिती आहे व त्याला ईश्वराकडेच परत जायचे आहे. अशा परिस्थितीत जीवनाचा अचूक उद्देश आणि जीवनात यशस्वी होण्याचा अचूक मार्ग माणूस

सांगू शकत नाही तर केवळ ईश्वर सांगू शकतो.

पृथ्वीवर माणसाला वसवल्यापासून वेळोवेळी ईश्वराने तत्कालीन प्रेषितांच्या माध्यमातून मानवी जीवनाचा उद्देश आणि त्यात यशस्वी होण्याचा मार्ग दाखवला. ईश्वराच्या सर्व प्रेषितांनी जगाला एकच संदेश दिला.

माणूस ईश्वराची निर्मिती आहे. तो सदैव राहण्यासाठी आहे. ईश्वराने त्याच्या जीवनाचे दोन भाग केले आहेत. १. मृत्युपूर्व जीवन, आणि २. मृत्यूनंतरचे जीवन.

मृत्युपूर्व जीवन हे परीक्षेचं जीवन आहे. या जीवनात माणसाला स्वातंत्र्य आहे. तो योग्य मार्ग निवडू शकतो किंवा अयोग्य मार्ग. योग्य मार्ग निवडल्यावर त्याला येथे तात्काळ बक्षीस नाही किंवा अयोग्य मार्ग निवडल्यावर त्याला येथे तात्काळ शिक्षा सुद्धा नाही. कारण हा परीक्षेचा कालावधी आहे, निवाड्याचा कालावधी नाही. मृत्यूचा क्षण येईपर्यंत प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. आणि जेव्हा मृत्यूचा क्षण येईल तेव्हा तो त्याच्या जीवनाचा अंत असणार नाही तर त्याच्या स्वातंत्र्याचा अंत असेल. यानंतर तो जीवनाच्या दुसऱ्या टप्प्यात पदार्पण करेल. या टप्प्यात आता कोणते भाग नाहीत. आता त्याला मृत्यू नाही. आता त्याला फक्त जगायचं आहे – सदैव आणि सदैव.

पण जीवनाचा हा दुसरा टप्पा पहिल्या टप्प्यात म्हणजे मृत्युपूर्व जीवनात केलेल्या कृतीच्या आधारावर, बाळगलेल्या श्रद्धेच्या आधारावर ठरणार आहे. आज माणसाकडे स्वातंत्र्य आहे. आज तो कोणत्याही मार्गाची निवड करू शकतो. पण चांगले आणि वाईट या दोन मार्गांपैकी ज्यांनी चांगल्या मार्गाची निवड केली त्यांच्यासाठी उद्या चांगल्या गोष्टींनी भरलेली जागा आहे. स्वर्ग आहे. आणि ज्यांनी वाईट मार्गाची निवड केली त्यांच्यासाठी वाईट गोष्टींनी भरलेली जागा आहे. नरक आहे. या पृथ्वीवर चांगले आणि वाईट दोन्ही लोक एकत्र आहेत. सुख आणि दुःख दोन्ही गोष्टी येथे आहेत. पण उद्या यांची विभागणी होईल – सगळे चांगले लोक आणि सुखाच्या गोष्टी एका बाजूला येतील आणि वाईट लोक व दुःखाच्या गोष्टी दुसऱ्या बाजूला. उद्या चांगल्यांना वाईटांचा शेजार नाही आणि वाईटांना चांगल्यांचा शेजार नाही. चांगल्या लोकांसाठी ईश्वराचं सान्निध्य आहे, या महान ब्रम्हांडाचा महान निर्माता माझ्या आचारविचारांशी प्रसन्न झाला आणि त्याने मला त्याच्या सान्निध्यात जागा दिली हा शब्दांत न वर्णन करता येणारा आनंद स्वर्गाच्या रहिवाशांना आहे. याउलट आपण इतकी आनंददायक गोष्ट प्राप्त करण्याची संधी गमावून

टाकली याचा वेदनादायक पश्चात्ताप, तीव्र नैराश्य आणि शाश्वत मानसिक त्रास नरकाच्या रहिवाशांच्या वाट्याला येणार आहे. स्वातंत्र्य असताना सुद्धा स्वतःला ईश्वराच्या बंधनात ठेवणाऱ्यांसाठी ईश्वराच्या कृपेने भरलेलं स्वर्ग आहे आणि स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणाऱ्यांसाठी ईश्वराच्या प्रकोपाने भरलेलं नरक आहे.

एखादी व्यक्ती मरते तर लोकांना वाटतं ती स्वर्गवासी झाली. एखादा आतंकवादी मरतो तर त्याच्या साहाय्यकांना वाटतं तो शहीद झाला आणि म्हणून स्वर्गवासी झाला. किंवा याचप्रमाणे आणखी कुणी म्हणेल अमुक गोष्टीवर विश्वास ठेवा तुमचे सर्व गुन्हे माफ होतील व मृत्यूनंतरच्या जीवनात स्वर्ग मिळेल. हे सर्व लोक प्रवचन देताना एक गोष्ट सहज विसरून जातात की ते स्वर्गाचे मालक नाहीत. याची सुद्धा कोणतीच शाश्वती नाही की दुसऱ्यांना स्वर्गात जाण्याची हमी देणारे हे लोक स्वतः कुठे जाणार आहेत – स्वर्गात का नरकात. स्वर्गाचा मालक आहे ईश्वर. त्यामुळे स्वर्गातील प्रवेश माणसाच्या वक्तव्यावरून नाही तर ईश्वराच्या वक्तव्यावरून ठरेल. ईश्वराचं वक्तव्य म्हणजे पवित्र धर्मग्रंथ.

स्वर्गाच्या मालकाने स्वर्गातील प्रवेशासाठी माणसाला दोन अटी पूर्ण करण्याचा आदेश दिला. १) ईश्वरावरील विश्वास, २) चांगली कृत्ये.

ईश्वरावरील विश्वास म्हणजे काय आहे? ईश्वरावरील विश्वास म्हणजे असं नाही की एखाद्या माणसाने आपले ओठ हालवावेत आणि त्याच्या तोंडातून आवाज निघावा 'माझा ईश्वरावर विश्वास आहे'. कारण अशी साक्ष निर्जीव साक्ष आहे. एखाद्या टेपरिकॉर्डर किंवा टीव्हीमधून आवाज निघण्यासारखं हे आहे. 'ईश्वरावरील विश्वास' म्हणजे एक अनुभव आहे. आकाशाकडे नजर गेल्यानंतर जेव्हा माणसाला कळतं की असा आकाश ईश्वराशिवाय कोणीच बनवू शकत नाही. आणि तो साक्ष देतो की मी त्यासमोर नतमस्तक आहे जो निर्माता आहे या आकाशाचा. ही जिवंत साक्ष आहे. एखाद्या पक्ष्याकडे, प्राण्याकडे, झाडांकडे किंवा कशाकडेही नजर पडली तर जेव्हा त्याला अनुभव होतो की या सर्वांना निर्माण करणारा कोण आहे? ईश्वराशिवाय कोणीच निर्मिती करू शकत नाही या विचारांनी जेव्हा त्याचं मन भरून येतं आणि ते ओरडून सांगतं की हे ईश्वरा, तू महान आहेस, मी तुझ्यापुढे नतमस्तक आहे, मी तुझा दास आहे, माझ्या श्रद्धेचा तू स्वीकार कर. तेव्हा या अनुभवाला, अशा दिलेल्या साक्षीला ईश्वरावरील खरा विश्वास म्हणता येईल.

खुद्द ज्या पृथ्वीवर माणूस राहतो तिचा सुद्धा विचार केला तरी तो ईश्वरापुढे

विनम्रपणे नतमस्तक होऊन जाईल. तिकडे वैज्ञानिकांची संघटना चंद्र, मंगळ इत्यादी ग्रहांना माणसाच्या राहण्यालायक बनवता येईल का हे शोधत आहे. यासाठी ते तेथे पाणी आहे का हे शोधत आहेत. बघा, किती गमतीशीर गोष्ट आहे ही! कारण तुम्ही जर इतके हुशार आणि स्वावलंबी आहात आणि तुम्हाला ईश्वराशिवाय काहीही करता येत असेल तर तेथे पाणी आहे का हे का शोधता? स्वतः निर्मिती का करत नाही पाण्याची? तेथे आधी तुम्ही पाणी शोधणार आणि जर तेथे पाणी मिळालं (जे की कधीच शक्य नाही) ते पाणी वापरून घरे बनवणार आणि मग श्रेय घेणार की आता माणसाने इतकी प्रगती केली की तो चंद्रावर राहू शकतो. कृतघ्नतेचा कळस आहे हा!

उदाहरण म्हणून मी हे लिहिलं पण ही वाटावी इतकी सोपी गोष्ट नाही. चंद्रावर पाणी मिळणं माणूस तेथे राहू शकण्यास पुरेसं नाही. केवळ पाणी असल्यामुळे माणूस पृथ्वीवर राहू शकत आहे असे नाही. माणसाला पृथ्वीवर चालता येण्यासाठी गुरुत्वाकर्षण येथे आहे. सूर्याच्या विनाशकारी किरणांपासून रक्षा करण्यासाठी पृथ्वीच्या वातावरणात ओझोनचा थर आहे, माणूस राहू शकेल असं तापमान आहे, त्याच्यासाठी विविध प्रकारचं अन्न आहे, जग चालण्यासाठी लागणाऱ्या इतर असंख्य गोष्टी पृथ्वीच्या गर्भात आहेत. या क्षणी ज्या लॅप्टॉपवर मी हा मजकूर लिहीत आहे त्याला बनवण्यासाठी लागलेली प्रत्येक गोष्ट पृथ्वीच्या गर्भातून निघालेली आहे. कोणी यांची स्वतः निर्मिती केलेली नाही. इतकंच कशाला या वस्तू एकत्र करण्यात जी बुद्धी वापरली गेली ती सुद्धा ईश्वरानेच दिलेली होती. एकंदरीत माणूस विचार करू लागला तर तो ईश्वराच्या कृपेच्या आणि त्याच्या महानतेच्या जाणिवेने भरलेल्या अंतःकरणाने त्याच्यापुढे नतमस्तक होतो. पूर्णपणे हे समजून जीवन जगतो की ईश्वराशिवाय कोणाचीच पूजा केली जाऊ शकत नाही. कारण ईश्वरापुढे कोणाचं काही अस्तित्वच नाही. प्रत्येक गोष्ट आणि प्रत्येक जण त्याची निर्मिती आहे आणि त्याच्या बंधनात आहे. कोणाकडेही काहीही नाही आणि ईश्वराकडे सर्व काही आहे. सर्व जण शक्तिहीन आहेत आणि तो एकटा शक्तिशाली आहे.

येथपर्यंत स्वर्गप्राप्तीची पहिली अट – ईश्वराला ओळखणे, निर्मितीची नाही तर निर्मात्याची पूजा करणे याबद्दल आपण बोललो. आता दुसऱ्या अटीकडे आपण वळू. दुसरी अट आहे – चांगली कृत्ये करणे. ही दुसरी अट ईश्वराला ओळखलेल्या माणसासाठी किरकोळ गोष्ट आहे. कारण ज्याला हे माहीत आहे

की सर्व काही ईश्वरासमोर घडत आहे तो ईश्वराच्या उपस्थितीत चूक कृत्ये करण्याची कल्पनाच करू शकत नाही, दुसऱ्याच्या जीवनात आपल्याकडून हस्तक्षेप होऊ देण्याचा तो विचारच करू शकत नाही. स्वातंत्र्य असताना सुद्धा तो स्वतःला पूर्णपणे बंधनात ठेवतो. त्या ईश्वराकडे ज्यासमोर माझं काहीच अस्तित्व नाही मला जाब द्यावा लागणार आहे या वास्तविकतेची तीव्रता तो जाणतो. स्वतःला मर्यादेत ठेवतो आणि ईश्वराने दर्शविलेल्या मार्गाने जीवन जगतो.

ईश्वराला ओळखू न शकलेले लोक आपल्या तर्कानुसार यशाची व्याख्या घेऊन जीवन जगत असतात. ज्याला सुखसोयी मिळालेल्या नाहीत तो सुखसोयी प्राप्त करण्यासाठी धडपडत असतो आणि ज्याला मिळालेल्या आहेत तो त्यांचा उपभोग घेऊ शकत नसल्याने तडफडत असतो. कोणाला हा आजार असतो तर कोणाला तो आजार, कोणाला ही अडचण असते तर कोणाला ती अडचण. सर्व जण समाधानाच्या शोधात काहीतरी करण्याचा प्रयत्न करतात पण ती गोष्ट त्यांना समाधान देत नसल्याचे ते दररोज अनुभवतात.

कोणाला वाटतं मुक्या प्राण्यांना खाऊ घालून त्याला समाधान मिळेल. कोणाला वाटतं लोकांशी प्रेमाने वागून त्याला समाधान मिळेल. कोणाला वाटतं डोक्यातील सर्व विचार बाजूला सारून ध्यान करत बसल्याने त्याला शांती मिळेल. पण दिवसअखेर हे सर्व उपाय निष्फळ असल्याचे सिद्ध होतात. कारण या सर्व गोष्टी दुय्यम दर्जाच्या असल्याचे त्यांना कळलेले नाही. मुख्य गोष्ट आहे ईश्वराला ओळखणे. स्वतः ईश्वराच्या वक्तव्यानुसार माणसाच्या अंतःकरणाला शांती ईश्वराच्या आठवणीने प्राप्त होते. जेव्हा ईश्वराने मनःशांतीचा हा नियमच बनवून ठेवला आहे तेव्हा ईश्वराच्या पृथ्वीवर राहताना माणूस याशिवाय दुसऱ्या मार्गाने जाऊन मनःशांती मिळवू शकत नाही.

सरतेशेवटी ईश्वराशी प्रार्थना करून हे लिहिणं मी संपवतो की ईश्वरा, आम्हाला विचार करण्याची बुद्धी दे. डोळे बंद करून काम करण्याची नाही तर दिलेल्या डोळ्यांना वापरून काम करण्याची बुद्धी दे. त्या मार्गावर आम्हाला चालव ज्या मार्गावर जाऊन उद्या आमच्या वाट्याला पश्चात्ताप आणि निराशा येणार नाही तर तुझी कृपा आणि तुझी प्रसन्नता आमच्या वाट्याला येईल. जीवनाच्या या भागात सुद्धा आम्हाला यशस्वी कर आणि जीवनाच्या दुसऱ्या भागात सुद्धा यशस्वी कर. निःसंशय तुझ्याशिवाय कोणीच आमचा वाली नाही.